नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २४९ Issue - 249 | वार गुरुवार दि. २९ जानेवारी २०२६ Blow- Thursday Date 29 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com



# विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन

## विमान धावपट्टीवरून घसरुन अपघात ; तीन दिवसांचा दुखवटा, उद्या अंत्यसंस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बारामती : राज्याचे उपमुख्यमंत्री आणि सर्वात धडाडीचे नेते आणि प्रत्येक दिवसाची सुरुवात पहाटे करून अवघ्या महाराष्ट्राला आदर्श घालून देणारे महाराष्ट्राचे 'दादा' व्यक्तिमत्व उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांचे आज (२८ जानेवारी) बारामतीमध्ये विमान अपघातात निधन झाले. अजित पवार ६६ वर्षांचे होते. अजित पवार यांच्यासह पाच जणांचा या अपघातात मृत्यू झाला. अजित पवार मुंबईहून बारामतीला एका खासगी विमानाने प्रवास करत होते. हे विमान तढ-डडघ नोंदणी क्रमांक असलेले बॉम्बार्डियर लिअरजेट ४५ मॉडेलचे होते. अजित पवार यांच्यासह त्यांचे अंगरक्षक विदीप जाधव, फ्लाईट असिस्टंट पिंकी माळी, कॅप्टन सुमित कपूर आणिकॅप्टन शांभवी पाठक अपघातात मृत्यूमुखी पडले. प्रशासनावर पकड असलेला धुरंदर नेता, आपल्याला जे पटलं नाही ते बेधकडपणे बोलणारे दादा, कार्यकर्त्यांना जागेवर सुनावणारे दादा, राजकीय विरोधकांनाही त्याच भाषेत सुनावणारे दादा अशा एक नव्हे तर अनेक आठवणी महाराष्ट्राच्या राजकारणात दादांच्या व्यक्तिमत्वाने कोरल्या गेल्या आहेत.

अजित पवार जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी बारामतीला जात होते. त्यांच्या आज चार ते पाच सभा होणार होत्या. ते मुंबईहून निघाले. महाराष्ट्र विमान वाहतूक विभागाच्या म्हणण्यानुसार, वैमानिकाने बारामती विमान-तळावर उतरण्याचा प्रयत्न केला, परंतु धावपट्टी स्पष्ट दिसत नसल्याने पायलटने विमान अधिक उंचीवर नेले. पहिला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर, बारामतीच्या धावपट्टी ११ वर उतरण्याचा आणखी एक प्रयत्न करण्यात आला. या दरम्यान, विमान धावपट्टीवरून घसरले आणि अपघात झाला आणि त्यात आग लागली. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, वैमानिकाने लँडिंग दरम्यान सकाळी ८:१० वाजता कोणताही आपत्कालीन सिग्नल दिला नाही. त्याने 'मेडे' कॉलही केला नाही.

सकाळी पावणे नऊच्या सुमारास भीषण अपघात झाला. अपघातानंतर विमानाचे अक्षरश: तुकडे झाले होते. अपघातग्रस्त विमान पाहिल्यानंतर अनेकांना जागेवर अश्रु अनावर झाले. अवघ्या काही वेळातच अजित पवार यांच्या निधना-ची बातमी समजताच अवघा महाराष्ट्र शोकसागरात बुडाला. मुंबईत पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांसह सर्व संस्थांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तीन दिवसांचा राज्य दुखवटाही जाहीर करण्यात आला आहे. दरम्यान, अजित पवार यांच्या पार्थिवावर उद्या (२९ जानेवारी) विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात अंत्यसंस्कार होणार आहेत. अंत्यसंस्काराला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह राज्यातील मंत्रिमंडळातील नेते उप-स्थित राहणार आहेत. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर मोदी यांनी शरद पवार यांना फोन करून सांत्वन केले. अजित पवारांच्या अकाली निधनानंतर राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, खासदार प्रियंका गांधी यांच्यासह देशातील नेत्यांनी श्रद्धांजली वाहिली. राज्यभरातून कार्यकर्तेही मोठ्या प्रमाणात बारामतीमध्ये दाखल झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बारामतीमध्ये पोहोचले आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे उद्या अंत्यसंस्कारासाठी बारामतीमध्ये पो-होचणार आहेत.

**प्रत्यक्षदर्शीने सांगितले, शरीराचे अवयव ब्लँकेटने झाकले**

प्रत्यक्षदर्शी महिलेने सांगितले की, विमानाचा स्फोट इतका जोरदार होता की कोणीही काहीही करू शकले नाही. बचाव पथक आले आणि आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी सुद्धा आम्हाला पाणी आणण्यास सांगितले. आम्ही बादल्यांमध्ये पाणी आणले. अजित पवार यांचे शरीर एका बाजूला पडले होते. आम्ही ते आमच्या स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले. आम्ही एक नवीन ब्लँकेट दिले आणि त्यांचे शरीर त्यात गुंडाळले. सुमारे अर्धा तास आग सुरु होती. चष्मा आणि घड्याळावरून आम्हाला ते अजित दादा असल्याचे ओळखता आले.

**साडे चार दशकांपासून राजकारणात**

अजित पवार यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील काटेवाडी आहे. मात्र, त्यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील देवळाली (प्रवरा) या त्यांच्या आजोळच्या गावी झाला. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण तेथेच झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी अजित पवार मुंबईत आले, शिक्षण पूर्ण करून बारामतीला आले आणि तेथील सहकारी संस्थांमधून त्यांनी सामाजिक व राजकीय कार्याला सुरुवात केली. अजित पवार यांनी १९८२ साली राजकारणात प्रवेश केल्यानंतर ते अखेरचा श्वास घेण्यापर्यंत ते राजकारणात सक्रिय राहिले. (पान ३ वर...)


### महाराष्ट्राचे विक्रमी सहा वेळा उपमुख्यमंत्री

**२२ जुलै १९५९ रोजी आशा आणि अनंतराव पवार यांच्या पोटी जन्मलेले अजित पवार १९८२ मध्ये राजकारणात आले, त्यांचे काका (त्यांच्या वडिलांचे धाकटे भाऊ) शरद पवार यांच्या पावलावर पाऊल ठेवून, जेव्हा ते साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर निवडून आले. महाराष्ट्राचे विक्रमी सहा वेळा उपमुख्यमंत्री म्हणून काम केलेले अजित पवार कधीही मुख्यमंत्री झाले नाहीत. जुलै २०२३ मध्ये भाजप आणि शिवसेना युती सरकारमध्ये सामील होण्यापूर्वी, त्यांनी नोव्हेंबर २०१९ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना उपमुख्यमंत्री म्हणून काम केले, परंतु त्यांचे सरकार केवळ दोन दिवस टिकले. अजित पवार हे सध्याच्या सरकारमध्ये अर्थ आणि नियोजन मंत्री होते. पुढील महिन्यात २३ फेब्रुवारी रोजी मुंबईत राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात होत असताना ते २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर करणार होते.**

# 'हा निव्वळ अपघात, यात राजकारण नाही' : शरद पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आज विमान अपघातात निधन झालं आहे. या घटनेवर अजित पवार यांचे काका तथा महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्राच कधीही न भरुन निघणारं असं नुकसान या घटनेमुळे झालं आहे. तसेच हा निव्वळ अपघात आहे. यात राजकारण नाही, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली आहे. शरद पवार यावेळी खूप भावूक झालेले बघायला मिळाले. त्यांना बोलता देखील येत नव्हतं. तसेच आपण आज मीडियासमोर येणार नव्हतो, असंही शरद पवारांनी आपली प्रतिक्रिया देताना नमूद केलं.



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं अपघाती निधन झालं. महाराष्ट्राला हा प्रचंड मोठा धक्का आहे. एक कर्तृत्वान नेत्याला महाराष्ट्र आज मुकला आहे. हे जे नुकसान झालं ते भरुन निघणारं नाही. मी आज मीडियासमोर येणार नव्हतो. पण काही जणांनी या अपघातामागे काही तरी राजकारण आहे, अशा प्रकारची भूमिका घेतली. याच्यात राजकारण नाही. हा निव्वळ अपघात आहे. त्याच्या यातना महाराष्ट्राला आणि आम्हा सर्वांना होत आहेत. कृपा करुन इथे राजकारण नाही एवढंच सांगायचं आहे, असं अजित पवार म्हणाले.

अजित पवार यांचं पार्थिव आता बारामतीत विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात ठेवण्यात येत आहे. अजित पवार यांना अखेरचं पाहण्यासाठी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात जमली आहे. अजित पवार यांना बारामतीच्या मेडिकल कॉलेजमधून विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात नेण्यात येत आहे. रुग्णालयाच्या बाहेर देखील मोठी गर्दी जमली आहे. अजित दादा अमर रहे, अशा घोषणा कार्यकर्त्यांकडून केल्या जात आहेत. अनेक कार्यकर्त्यांचा आक्रोश सुरु आहे. अनेक दिग्गज नेते ढसाढसा रडत आहेत. अजित पवार हे पक्षाचे प्रमुख होते. त्यांनी दाखवलेल्या दिशेकडे पाऊल ठेवून नेते राजकारण करत होते. त्यामुळे आम्ही पोरके झालो, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीचे नेतेमंडळी देताना दिसत आहेत.



**अजितदादांच्या निधनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून प्रतिक्रिया**

# माझा दमदार आणि दिलदार मित्र हरवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आज सकाळी ९ च्या सुमारास विमान अपघातामध्ये निधन झाले. बारामती येथे विमान लँड करताना हा अपघात झाला. त्यावेळी अजित दादांचे विमान कोसळले आणि त्याचा स्फोट झाला. या स्फोटामध्ये अजित दादांसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला. दादांच्या अकाली जाण्याने राज्यभर हळहळ व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय सुट्टी आणि तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे. फडणवीसांनी यावेळी बोल-ताना माझा दमदार आणि दिलदार मित्र हरवल्याचं म्हणत आपलं दु:ख व्यक्त केलं आहे.

सकाळी अतिशय दु:खद घटना घडली आहे. अनाकलनीय परिस्थितीमध्ये विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याची वार्ता मिळाली आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शोककळा पसरली. अजित पवार हे लोकनेते होते, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेला, महाराष्ट्रांच्या प्रश्नांची जाण असलेला नेता होता. त्यांच्याबद्दल जनसामान्यांमध्ये प्रचंड आस्था होती, सर्व परिस्थितीमध्ये न डगमगता पुढे जाणारं हे व्यक्तिमत्व होतं. महाराष्ट्राकरता आजचा दिवस कठीण आहे, दादांसारखं नेतृत्त्व तयार व्हायला अनेक वर्ष लागतात. ज्यावेळी महाराष्ट्राच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण देत होते अशा काळामध्ये त्यांचं निघून जाणे अविश्वसनीय आणि मनाला चटका लावणारं असल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

महाराष्ट्राचं लाडकं नेतृत्व हरपलं; बारामतीतील विमान अपघातात



उपमुख्यमंत्री अजित पवारांचा मृत्यू

माझ्याकरता वैयक्तित एक दमदार आणि दिलदार अशा प्रकारचा मित्र या ठिकाणी सोडून गेलेला आहे. एकनाथ शिंदे आम्ही बारामतीकडे निघणार आहोत. पंतप्रधान आणि गृहमंत्री यांना घडलेल्या परिस्थितीची माहिती दिली असून त्यांनी प्रचंड दु:ख व्यक्त केलं. राज्यासह देशभरात हळहळ पसरली आहे. पुढील सर्व गोष्ट परिवारासोबत चर्चा करून ठरवण्यात येतील. संपूर्ण पवार कुटुंब बारामतीला पोहोचल्यानंतर त्यांच्या संमतीने घेतली जातील. महाराष्ट्रामध्ये आज शासकीय सुट्टी आणि तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. पुढील सर्व बाबींची कल्पना देण्यात येईल, कधीही भरून निघणार हे नुकसान आहे. लोकनेते गेल्यावर ही पोकळी भरून काढणं कठीण आहे. इतक्या संघर्षाच्या काळात सोबत काम केले आहे. खरंतरं विश्वास ठेवायला मन तयार होत नाहीये, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

दरम्यान, या अपघातामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आहे. १) अजित पवार २) विदीप जाधव (अजित पवार यांचे खासगी सुरक्षारक्षक) ३) सुमित कपूर (पायलट कॅप्टन) ४) संभवी पाठक (कॅप्टन) ५) पिंकी माळी (फ्लाईट अटेंडंट)

# अजित पवारांचं अकाली निधन अत्यंत धक्कादायक, पंतप्रधान मोदींची दादांसाठी भावूक पोस्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं बारामतीमध्ये विमान अपघातात निधन झालं. त्यांच्या जाण्याने संपूर्ण राज्यभरात शोककळा पसरली असून कार्यकर्ते, नेते यांना अश्रू अनावर झाले आहेत. अजित पवारांसह विमान अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. अजित पवारांच्या निधनावर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर अजित दादांसोबतचे फोटो पोस्ट करत भावूक प्रतिक्रिया दिली आहे.

'श्री अजित पवार जी हे जन-तेशी घट्ट नाते असलेले, तळ-ागाळाशी मजबूत नाळ अस-लेले लोकनेते होते. महाराष्ट्रातील जनतेच्या सेवेत सदैव अग्रभागी राहणारे एक मेहनती व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना व्यापक आदर होता. प्रशासकीय बाबींची त्यांना सखोल



जाण होती. गरीब आणि वंचितांच्या सक्षमीकरणासाठीची त्यांची तळमळ विशेष उल्लेखनीय होती. त्यांचे अकाली निधन अत्यंत धक्कादायक व दुःखद आहे. त्यांच्या कुटुंबीयांप्रती आणि असंख्य चाहत्यांप्रती मनःपूर्वक शोकसंवेदना. ॐ शांती.'

अजित दादा त्यांच्या विमाना-तून आज बुधवारी सकाळी मुंबईतून बारामतीसाठी निघाले होते. सकाळी ८ वाजून १० मिनिटांनी ते मुंबईतून निघाले. त्यानंतर बारामतीमध्ये ८ वाजून ४५ मिनिटांनी त्यांचं विमान आलं. मात्र विमानाचा बारामतीमधील एका शेतात अपघात झाला. विमान शेतात कोसळलं आणि मोठा स्फोट झाला. विमानाने पेट घेतल्याने भीषण आग लागली. यात आगीत अजित पवारांसह असलेल्या इतर चार जणांचाही मृत्यू झाला आहे. अजित पवारांसह विमानात दोन पायलट, एक क्रू मेंबर तसंच त्यांचे पीए होते. या पाचही जणांचा विमान अपघातात मृत्यू झाला आहे.

बारामतीमधील मेडिकल कॉलेजमध्ये दादांसह सर्व विमान अपघातातील मृतांचे मृतदेह ठेवण्यात आले आहेत. शरद पवार, प्रतिभा पवार मुंबईतून, तर सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार या दिल्लीतून बारामतीमध्ये दाखल झाल्या आ-हेत. अजित दादांच्या जाण्याने संपूर्ण पवार कुटुंबावर शोककळा पसरली आहे. केवळ पवार कुटुंबीयच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात नेते, कार्यकर्ते दादांच्या जाण्याने दु:ख व्यक्त करत ढसाढसा रडत आहेत.

## संपादकीय....

# दादा काळाच्या पडद्याआड

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि सर्वात धडाडीचे नेते आणि प्रत्येक दिवसाची सुरुवात पहाटे करून अवघ्या महाराष्ट्राला आदर्श घालून देणारे महाराष्ट्राचे 'दादा' व्यक्तिमत्व उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांचे आज (२८ जानेवारी) बारामतीमध्ये विमान अपघातात निधन झाले. अजित पवार ६६ वर्षांचे होते. अजित पवार यांच्यासह पाच जणांचा या अपघातात मृत्यू झाला. अजित पवार मुंबईहून बारामतीला एका खासगी विमानाने प्रवास करत होते. प्रशासनावर पकड असलेला धुरंदर नेता, आपल्याला जे पटलं नाही ते बेधकडपणे बोलणारे दादा, कार्यकर्त्यांना जागेवर सुनावणारे दादा, राजकीय विरोधकांनाही त्याच भाषेत सुनावणारे दादा अशा एक नव्हे तर अनेक आठवणी महाराष्ट्राच्या राजकारणात दादांच्या व्यक्तिमत्वाने कोरल्या गेल्या आहेत. सकाळी पावणे नऊच्या सुमारास भीषण अपघात झाला. अपघातानंतर विमानाचे अक्षरशः तुकडे झाले होते. अपघातग्रस्त विमान पाहिल्यानंतर अनेकांना जागेवर अश्रु अनावर झाले. अवघ्या काही वेळातच अजित पवार यांच्या निधनाची बातमी समजताच अवघा महाराष्ट्र शोकसागरात बुडाला. अजित पवार यांच्या पार्थिवावर उद्या (२९ जानेवारी) विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात अंत्यसंस्कार होणार आहेत. अंत्यसंस्काराला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह राज्यातील मंत्रिमंडळातील नेते उपस्थित राहणार आहेत. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर मोदी यांनी शरद पवार यांना फोन करून सांत्वन केले. अजित पवारांच्या अकाली निधनानंतर राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, खासदार प्रियंका गांधी यांच्यासह देशातील नेत्यांनी श्रद्धांजली वाहिली. राज्यभरातूनर कार्यकर्तेही मोठ्या प्रमाणात बारामतीमध्ये दाखल झाले आहेत. अजित पवार यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील काटेवाडी आहे. मात्र, त्यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील देवळाली (प्रवरा) या त्यांच्या आजोळच्या गावी झाला. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण तेथेच झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी अजित पवार मुंबईत आले, शिक्षण पूर्ण करून बारामतीला आले आणि तेथील सहकारी संस्थांमधून त्यांनी सामाजिक व राजकीय कार्याला सुरुवात केली. अजित पवार यांनी १९८२ साली राजकारणात प्रवेश केल्यानंतर ते अखेरचा श्वास घेण्यापर्यंत ते राजकारणात सक्रिय राहिले. पवार कुटुंबीयांचे वलय महाराष्ट्रासाठी नवीन नाही. गेल्या सहा दशकांपासून पवार कुटंबीयांचं गारुढ समाज आणि राजकारणावर राहिलं आहे. शरद पवारांनी राष्ट्रवादीची स्थापना झाल्यानंतर अजित पवार यांनी केलेल्या बंडानंतर त्याची दोन शकले झाली. त्यामुळे कुटुंबातही विसंवाद झाला होता. मात्र, गेल्या काही दिवसांपासून झालं गेलं विसरून गेलं म्हणत अजित पवार आणि शरद पवार यांच्यातील राजकीय वादाची दरी कमी झाली होती. १२ डिसेंबर रोजी शरद पवार यांच्या वाढदिनी अजित पवार एकत्र जमले होते. त्यानंतर बारामतीमध्ये झालेल्या विद्या प्रतिष्ठानमध्ये झालेल्या कार्यक्रमातही हे काका पुतण्या एकत्र आले होते. महानगरपालिका निवडणुकीपासून दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा रंगली होती. मात्र, काळाने घातलेल्या झडपेत या सर्व आठवणी आता भुतकाळात गेल्या आहेत.

# बुवाबाजी : आंबेडकरी विवेकाचा पराभव की सामाजिक आत्महत्या?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय समाजाच्या इतिहासात अंधश्रद्धा ही केवळ धार्मिक समस्या राहिलेली नाही; ती सत्ता, अर्थकारण आणि मानसिक गुलामी यांचे सर्वात प्रभावी साधन बनली आहे. विज्ञान, शिक्षण आणि लोकशाही यांच्या युगातही बुवाबाजी टिकून आहे, याचा अर्थ समाजाने आधुनिकतेचा स्वीकार केला असला तरी विवेकाचा स्वीकार केलेला नाही. विदर्भातील विक्तूबाबा ही केवळ एका व्यक्तीची कथा नाही; ती संपूर्ण समाजाच्या वैचारिक अपयशाची आरसेदर्शी कहाणी आहे. विदर्भातील मोठ्या बाबांपैकी एक म्हणजे विक्तूबाबा. नागपूर जिल्ह्यात त्याचे भव्य देवस्थान उभे आहे. आज हे देवस्थान कोट्यधीश बनले आहे. पण या देवस्थानामागील वास्तव वेगळे आहे. वास्तविक पाहता विक्तूबाबा हा मानसिकदृष्ट्या अपंग मुलगा होता. वयात आल्यानंतर स्त्रिया दिसल्या की चावायला धावायचा; म्हणून त्याच्या नातेवाईकांनी त्याच्या हातापायात बेड्या घातल्या. हाच पुढे बेडीवाले-विक्तूबाबा म्हणून प्रसिद्ध झाला. दलित समाजामध्ये या बाबाला फार मानाचे स्थान मिळाले आणि प्रचंड जनसमुदाय त्याच्यावर श्रद्धा ठेवू लागला. एका मानसिकदृष्ट्या अपंग व्यक्तीला देवत्व देणे, त्याच्या विकृतीला चमत्काराचे रूप देणे आणि त्याच्या नावावर कोट्यवधी रुपयांचे देवस्थान उभे राहणे हे श्रद्धेचे नव्हे, तर विवेकाच्या पराभवाचे लक्षण आहे. समाजाने जेव्हा प्रश्न विचारणे थांबवले, तेव्हा बुवाबाजी जन्माला येते. बुवाबाजी ही अंधश्रद्धेची आधुनिक आवृत्ती आहे. ती देवाच्या नावाने नव्हे, तर माणसाच्या नावाने चालते, म्हणूनच ती अधिक धोकादायक आहे. बुद्धांचा विचार याच बुवाबाजीच्या मुळावर घाव घालणारा आहे.

बालपणी मी स्वतः विक्तूबाबाला पाहिले आहे. सतत घाणेरड्या शिव्या देणारा, हातापायात बेड्या असणारा हा बाबा; ज्याच्या भोवती भक्तांचा गराडा असायचा. त्याच्या प्रत्येक पागल हावभावाचा भक्त आपापल्या परीने अर्थ काढायचे. मोठ्या प्रमाणावर पेढे, नारळ, पैसे बाबाला वाहिले जायचे आणि त्याच वस्तू पुन्हा दुकानांत विक्रीला ठेवण्यात यायच्या. टी.बी., महारोग आणि कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचे रुग्णही विक्तूबाबाकडे येताना मी पाहिले. त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधल्यावर बाबाच्या कृपेने रोग बरे होतात हा केवळ विश्वास नव्हे, तर अनुभव असल्याचा दावा ऐकून मी स्तब्ध झालो. कारण विक्तूबाबांची आई महारोगाची रुग्ण होती आणि ती बाबा आमटेंच्या दवाखान्यात दीर्घकाळ उपचार घेत होती. विक्तूबाबाच्या घाणेरड्या शिव्यांतूनही चांगला अर्थ काढण्याचा भक्तांचा अट्टाहास विलक्षण होता. काही भक्त तर मुद्दाम बाबाला त्रास देत, जेणेकरून त्याने शिव्या द्याव्यात. त्या शिव्या मोजून काही लोक सट्टा-जुगार लावत असत. हा प्रकार केवळ हास्यास्पद नव्हे, तर समाजाच्या मानसिक अधःपतनाचे प्रतीक होता. आजही काही लोक लग्नाची पत्रिका समाजात वाटण्यापूर्वी विक्तूबाबाच्या चरणी ठेवतात. हा केवळ श्रद्धेचा प्रश्न नाही; तो मानसिक गुलामीचा पुरावा आहे. जीवनातील प्रत्येक निर्णय स्वतःच्या बुद्धीने घेण्याऐवजी बाबाच्या आशीर्वादावर अवलंबून राहणे म्हणजे विवेकाचा त्याग होय.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

बुद्धाने सांगितले अत्त-दीप-भव, म्हणजे स्वतःचा दिवा व्हा. पण आजचा समाज म्हणतो, बाबाचा दिवा व्हा. हा फरक केवळ शब्दांचा नाही; तो मानसिकतेचा आहे. बुद्धधम्माचा अर्थ देव बदलणे नव्हे, तर विचार बदलणे आहे. जो समाज बुद्धाचा धर्म स्वीकारूनही चमत्कार शोधतो, तो बुद्धाचा नाही, तर बुवांचा अनुयायी ठरतो. म्हणूनच बुवाबाजी ही केवळ धार्मिक समस्या नाही; ती बुद्धविचाराच्या पराभवाची चिन्हे आहेत. जर बुद्धाचा विचार खरोखर स्वीकारायचा असेल, तर बुवाबाजीला केवळ विरोध करणे पुरेसे नाही; तिच्या मुळावरच घाव घालावा लागेल. कारण बुद्धाचा मार्ग स्पष्ट आहे, श्रद्धेपासून विवेकाकडे, देवापासून मानवाकडे आणि चमत्कारापासून विज्ञानाकडे. बुद्धाने देव, चमत्कार आणि अंधश्रद्धा यांना थेट आव्हान दिले. कोणत्याही गोष्टीवर केवळ परंपरेमुळे, धर्मामुळे किंवा कोणाच्या सांगण्यामुळे विश्वास ठेवू नका; स्वतःच्या बुद्धीने तपासून पाहा हा बुद्धाचा मूलमंत्र होता. त्यामुळे बुद्धधम्म हा पूजा, कर्मकांड किंवा बाबागिरीचा धर्म नाही, तर विवेक, अनुभव आणि तर्काचा धर्म आहे. बुद्धाने सांगितले की दुःखाचे कारण बाहेर नाही; ते आपल्या आत आहे. त्यामुळे दुःखावर उपाय शोधताना देव, बाबा किंवा चमत्कार शोधण्याची गरज नाही; गरज आहे ती स्वतःच्या बुद्धीची. विडंबन असे की बुद्धधम्म स्वीकारलेल्या समाजातच बुवाबाजी फोफावली आहे. बुद्धाच्या नावाने धर्म स्वीकारणारा समाज बाबांच्या चरणी नतमस्तक होतो, ही केवळ विसंगती नाही; ती बुद्धविचाराची विटंबना आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला केवळ अधिकार दिले नाहीत; त्यांनी त्याला विचार करण्याची शक्ती दिली. बाबासाहेबांचा धर्म हा देवाचा नव्हे, तर माणसाचा धर्म होता. बुद्धधम्म स्वीकारताना त्यांनी स्पष्ट सांगितले, श्रद्धा नव्हे, बुद्धी. त्यांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि देववाद यांना स्पष्ट नकार दिला. पण आज प्रश्न उभा राहतो, आपण बाबासाहेबांचे अनुयायी आहोत की त्यांच्या नावावर जगणारे भक्त? हजारो घरांमध्ये बाबासाहेब आंबेडकर आणि विक्तूबाबांचे फोटो शेजारी लावलेले दिसतात. हा केवळ प्रतीकात्मक विरोधाभास नाही; तो वैचारिक शून्याचा पुरावा आहे. दीक्षाभूमी ही केवळ भूभाग नाही; ती विवेकाची क्रांती आहे. ज्या भूमीवर बाबासाहेबांनी लाखो लोकांना अंधश्रद्धेपासून मुक्त केले, त्याच भूमीवर विक्तूबाबाचा सत्कार होणे म्हणजे बुद्धिवादाची सार्वजनिक हत्या आहे. याविरोधात मोजकेच बुद्धिवादी आवाज उठले; बहुसंख्य आंबेडकरी नेते मात्र गप्प राहिले. का? कारण भक्तांचा रोष, मतांचा तोटा आणि राजकीय नुकसान. इथे प्रश्न उभा राहतो की, राजकारणासाठी विवेकाचा बळी देणे ही आंबेडकरी चळवळ आहे का? जर हो, तर बाबासाहेबांचा विचार केवळ निवडणूक घोषणापत्रापुरता मर्यादित राहिला आहे, हे स्वीकारावे लागेल.

विक्तूबाबाचे देवस्थान आज कोट्यधीश आहे. हजारो भक्त दरवर्षी दर्शनाला येतात. नारळ, पेढे, पैसे, वस्त्र, दान या सगळ्यांतून एक प्रचंड अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. बुवाबाजी ही आज केवळ धार्मिक नव्हे, तर आर्थिक उद्योग बनली आहे. प्रश्न असा आहे की, हा पैसा कुठून येतो? तो येतो गरीब, असुरक्षित आणि असहाय लोकांकडून. जेव्हा राज्य त्यांना आरोग्य, शिक्षण आणि रोजगार देण्यात अपयशी ठरते, तेव्हा ते बाबांकडे धाव घेतात. म्हणजेच बुवाबाजी ही व्यवस्थेच्या अपयशाची उपज आहे. टी.बी., कॅन्सर, महारोग यांसारख्या रोगांवर बाबाच्या कृपेने उपचार होतात, असा विश्वास म्हणजे विज्ञानाचा अपमान आहे. पण या विश्वासामागे असलेली मानसिकता अधिक धोकादायक आहे, आपण स्वतः काही करू शकत नाही, कोणीतरी चमत्कार करावा लागेल. ही मानसिकता म्हणजेच मानसिक गुलामी.

सामान्यतः अंधश्रद्धा ही ग्रामीण समाजाशी जोडली जाते. पण दलित समाजात तिचे अस्तित्व अधिक खालवर आहे. कारण दलित समाजाने ऐतिहासिकदृष्ट्या सतत अपमान, शोषण आणि अन्याय सहन केला आहे. त्यामुळे त्याच्या मनात असुरक्षितता, भीती आणि आश्रयाची गरज निर्माण झाली आहे. बुवाबाजी ही त्या मानसिकतेचा परिणाम आहे. बाबासाहेबांनी दलित समाजाला मानसिक गुलामीतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. पण सामाजिक चळवळ दुर्बल झाल्यामुळे ती गुलामी नव्या रूपात परत आली, बुवाबाजीच्या रूपात. आज आंबेडकरी चळवळ राजकीयदृष्ट्या सक्रिय आहे. निवडणुका, मोर्चे, सभा, घोषणा हे सगळे सुरू आहे पण सामाजिक चळवळ मात्र निष्प्रभ झाली आहे. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर सामाजिक परिवर्तनाची मशाल कोणीच उचलली नाही. परिणामी, बाबासाहेबांचा फोटो सर्वत्र दिसतो; पण त्यांचा विचार समाजात दिसत नाही. आंबेडकरी चळवळ जर खरोखरच बाबासाहेबांची वारसदार असती, तर बुवाबाजीविरोधात ती सर्वात पुढे उभी राहिली असती. पण वास्तव उलट आहे. बुवाबाजीवर टीका केली की भावना दुखावतात असा युक्तिवाद केला जातो. प्रश्न असा आहे, भावना जपायच्या की विवेक?

बुद्धाने सांगितले काहीही अंधश्रद्धेने स्वीकारू नका. बाबासाहेबांनी त्याच विचाराला आधुनिक संदर्भ दिला. पण आज बुद्धधम्म स्वीकारलेल्या समाजातच अंगात येणारे बुद्ध, अंगात येणारे बाबासाहेब दिसतात. हा विरोधाभास केवळ हास्यास्पद नाही; तो धोकादायक आहे. कारण जेव्हा विचाराऐवजी चमत्कार महत्त्वाचा ठरतो, तेव्हा समाज पुन्हा मध्ययुगात परत जातो. प्रश्न विक्तूबाबाचा नाही; प्रश्न आपला आहे. विक्तूबाबा ही समस्या नाही; समस्या म्हणजे त्याला देवत्व देणारा समाज. विक्तूबाबा उद्या नाहीसा झाला, तरी उद्या दुसरा बाबा तयार होईल. कारण समाजाची मानसिकता बदललेली नाही. जो समाज बाबासाहेबांच्या नावाने राजकारण करतो, तोच समाज बुवांच्या चरणी नतमस्तक होतो, हा विरोधाभास केवळ वैचारिक नाही, तर नैतिकही आहे. आज समाजासमोर प्रश्न स्पष्ट आहे, आपण बाबासाहेबांच्या बाजूने उभे राहणार की बुवांच्या? बाबासाहेब म्हणजे प्रश्न विचारण्याची परंपरा. बुवा म्हणजे प्रश्न न विचारण्याची गुलामी. बाबासाहेब म्हणजे विज्ञान, तर्क आणि मानवतावाद, बुवा म्हणजे चमत्कार, अंधश्रद्धा आणि भीती. दोन्ही एकत्र चालू शकत नाहीत.

आता वेळ आली आहे की आंबेडकरी समाजाने आत्मपरीक्षण करावे. बाबासाहेबांचे फोटो घरात लावणे पुरेसे नाही; त्यांचा विचार जीवनात उतरवावा लागेल. जर तुमच्या घरात बुवाचा फोटो आहे, तर बाबासाहेबांचा फोटो केवळ सजावटीचा आहे, हे स्वीकारावे लागेल. जर तुम्ही बुवांच्या चरणी नतमस्तक होता, तर बाबासाहेबांच्या विचारांशी तुम्ही द्रोह करत आहात, हे मान्य करावे लागेल. आज गरज आहे ती निर्भीड वैचारिक क्रांतीची. बुवाबाजी विरोधात उभे राहणे म्हणजे धर्मविरोध नाही; ते मानवतावादाचे समर्थन आहे. अंधश्रद्धेविरोधात बोलणे म्हणजे समाजविरोध नाही; ते समाजाच्या मुक्तीसाठीचे युद्ध आहे. जर आंबेडकरी समाजाने आता प्रश्न विचारले नाहीत, तर भविष्यात बाबासाहेबांचा विचार केवळ पुस्तकांमध्ये उरेल आणि बुवाबाजी समाजावर राज्य करेल. म्हणूनच आजच निर्णय घ्या, देव नव्हे, विचार स्वीकारा! चमत्कार नव्हे, विज्ञान स्वीकारा! बुवा नव्हे, बाबासाहेब स्वीकारा! कारण विवेक हीच खरी क्रांती आहे आणि विवेकाशिवाय कोणतीही मुक्ती शक्य नाही !

# प्रजासत्ताक दिनाचा उद्देश साध्य होतो का?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारत हा मानसिक गुलामांचा देश आहे. वर्णव्यवस्थेचे जाती व्यवस्थेमध्ये रूपांतर करून येथील जाती जातीत वाद निर्माण करून जातीची उतरंड निर्माण केली आहे आहे. प्रत्येक जातीच्या खाली कोणतीतरी जात आहे म्हणून उतरंडीमधील एका वरची जात माझ्या खाली कोणी आहे म्हणून स्वतः खुश आहेत. जातीच्या या विषारी उतरंडीमुळे जातीपलीकडे कोणाला काहीच दिसले नाही.

प्रत्येक जातीला बौद्धिक दृष्ट्या गुलाम बनवण्यासाठी येथे अंधविश्वास, पाखंड पेरून भोंदूगिरी, बलात्कारी पाखंडी लोकांना उत आला आहे. अंधविश्वास आणि खोट्याला डोक्यावर घेऊन नाचवले जाते तर विज्ञान आणि सत्याला कुचलले जाते. मराठी मध्ये म्हन आहे सत्य बोलले तर आईला सुद्धां राग येतो तिच परिस्थिती देशात आहे. आपण सत्तेहत्तरावा प्रजासत्ताक दिन साजरा केला. पण काय प्रजासत्ताक दिन साजरा करणाऱ्याचा उद्देश पंचेहत्तर वर्षात पुर्ण झाला का? यावर मात्र स्वत:ला विद्वान, हुशार आणि समतावादी समजणाऱ्या लोकांनी कधीच चर्चा केली नाही. मी अनेक लेखांमधून एक गोष्ट नेहमी मांडली ती म्हणजे जातीवादाच्या चिखलात एवढे फसलो आहोत कि आपली बुद्धी आपण कुठे गहाण टाकून आपण कोणाला बेईमान झालो याचे देखील भान राहले नाही. प्रजासत्ताक दिन हा संविधानाचा सन्मान दिन आहे. संविधान लागु झाले येथील लोकांना मानवी, वैचारिक स्वातंत्र्य मिळून देशाची सत्ता माणसाच्या हातात आली. राजा महालातून नाही तर झोपडीतील व्यक्ती सुद्धां देशाचा कारभार चालवू शकतो ही ताकद संविधाने निर्माण करून दिली आहे. आज जी नोकरी आहे, जे संविधानीक पद आहे, जे राहणे खाणे आहे ते सर्व फक्त आणि फक्त संविधानाची देण आहे. चौकटीच्या आतील महिला विमानात फिरत आहेत. काल पर्यंत गुलाम असलेल्या स्त्रीया संविधानामुळे हक्क अधिकाराच्या गोष्टी करत आहेत. समाजामध्ये माणसा प्रमाणे मान सन्मान, स्थान आणि पगार घेऊन फिरत आहेत यावर चर्चा होऊन प्रत्येकाला सोन्याचे वैभव देणाऱ्या संविधानाप्रती आणि जगातील सर्वश्रेष्ठ संविधान निर्माण करणारे आणि संविधान निर्माण करताना सर्वांना समान संधी, सर्वांना समान हक्क अधिकार देऊन सर्वांना देशाची सारखी संपत्ती देणारे घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आभार मानण्याचा दिवस म्हणजे प्रजासत्ताक दिन होय. पण जातीने माखलेल्या आणि बुद्धीने बुरसटलेल्या लोकांनी संविधानाचे फायदे घेऊन संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना बेईमान झाले. कोणाचे मिठ जरी खाल्ले तरी त्याचे काम निट करावे असे सांगणारी संस्कृती असताना आज प्रत्येक भारतीयांच्या जवळ जे काही आहे ते फक्त आणि फक्त डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान यांच्या मुळेच तरीही लोक बेईमान आहेत.

प्रजासत्ताक दिन साजरा करून सोशल मिडिया वर अनेक फोटो आपल्याला दिसतात. ज्यांचा मेंदूच बुरसटलेला आहे त्या मानसाने कधीच संविधान घरात नेले नाही, संविधान कधीच वाचले नाही, संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नावही कधी घेऊन संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आभार मानले नाही. संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना बाजूला सारून प्रजासत्ताक दिन साजरा होतो का? प्रजासत्ताक दिनी डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान यांना वगळून भलतेच नको ते बोलून, भलतेच नको ते दाखवून स्वतः राष्ट्रभक्त होता येते का? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहले म्हणून ते संविधान घरात न नेणारे बुद्धीहीन लोक, संविधान एकाच जातीचे आहेत असे समजणारे बुरसटलेले लोक हे राष्ट्रभक्ती शिकवतील का? नाशिक मध्ये कोणत्या तरी नेत्याने म्हणे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले नाही. आणि तो म्हणतो अनावधानाने एखादे नाव राहले असेल. प्रजासत्ताक दिन साजरा करताना फक्त एकच नाव घ्यावे लागते. आणि ते घेतले जात नसेल तर डोक्यात आजही जगातील सर्वांत विद्वान, संविधानाच्या शिल्पकाराबद्दल ही भावना असेल तर संविधानाला माणणाऱ्या



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
(समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००)

आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायां बद्दल काय भावना असेल याचा विचार न केलेला बरा. फक्त नाशिक मध्येच हे झाले असे नाही. प्रजासत्ताक दिनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो ही लावला जात नव्हता आजही कितीतरी ठिकाणी फोटो लावला जात नाही. लावला फोटोतर बाबासाहेब आंबेडकर व संविधान यावर काही बोवले जात नाही. भलतेच काही ही बोलुन वेळ काढून घेतला जातो. प्रजासत्ताक दिनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटो शेजारी इतरही फोटो लावले जातात. प्रजासत्ताक दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटो शेजारी इतरांचे फोटो लावण्याला बिलकुल विरोध नाही पण इतर कार्यक्रमात त्या फोटो शेजारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो का नसतो हा मुळ प्रश्न आहे. आणि जाणीव पुर्वक इतर कार्यक्रमात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो न लावणे आणि प्रजासत्ताक दिनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटो ला प्रजासत्ताक दिन साजरा करताना सोशल मिडिया वर फोटो टाकताना डॉ बाबासाहेब आंबेडकर नाव फोटो न घेणे ही सरळ सरळ बेईमानी च नाही तर विषमतेचे जहर आहे आणि हा खरा राष्ट्रद्रोह आहे. स्वतःला अभ्यासक समजणारे, आम्ही ही बाबासाहेब आंबेडकर यांना माणतो असे म्हणणारे, स्वतःला निष्पक्ष पत्रकारिता करतो म्हणणाऱ्यांनी कधीच हा प्रश्न उपस्थित केला नाही किंवा या वर जागृती केली नाही. संविधानाच्या जोरावर संविधानीक पदावर बसलेले, संविधानामुळे शिकलेले, संविधानामुळे नोकरी करणारे, संविधानामुळे वेगवेगळे अनुदान घेणारे, संविधानमुळे वेगवेगळ्या योजनेचा फायदा घेणारे, पेन्शन, बोनस घेणारे एवढेच काय हक्क अधिकाराच्या गोष्टी करणारे जर पंचेहत्तर वर्षात देशाचे संविधान घरात आणु शकत नाहीत, ते वाचु शकत नाहीत. संविधानाच्या शिल्पकाराचे नावही घेऊ शकत नाहीत तर यांना विद्वान, सुशिक्षित आणि राष्ट्रप्रेमी म्हणायचे कसे? फक्त देखावा म्हणून प्रजासत्ताक दिनाचे स्टेटस ठेवणारे, प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण साठी जाणारे लोक जाणीव पुर्वक बाबासाहेब आंबेडकर व संविधानापासुन दूर जातात तर अशा विषमतावादी विचारसरणीच्या बुरसटलेला लोकांना माणूस तरी म्हणावे का? प्रजासत्ताक दिना निमित्ताने अनेकांची भाषणे ऐकली, अनेकांचे लेख वाचले पण बहुतांश लोकांनी प्रजासत्ताक दिनी भारत स्वातंत्र्य झाल्या बद्दल खोटे आणि फसवे शब्द वापरून सोईस्करपणे संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना बाजूला सारण्याचे काम केलेले दिसते. पण डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान




यांचे नाव न घेता लिहने बोलणे हा सुद्धां अधिकार त्यांनीच दिला हे तेवढेच खरे आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान याचे नाव घेऊन त्यांच्यावर वैचारिक चर्चा करणे हे खरोखरच वैचारिक लोकांचे काम आहे. ज्याचा मेंदुच बुरसटलेला आहे त्यांना संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर काय कळणार? बऱ्याच लोकांना या शब्दाचा राग येईल पण भावनिक न होता वैचारिक होऊन विचार करा वर्षेभर जाऊ द्या हो पण प्रजासत्ताक दिनी जर आपण संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना देशाचे माणत नसु तर यांच्या वर देशद्रोहाचा खटलाच भरला गेला पाहिजे. प्रजासत्ताक, संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर आज पर्यंत फक्त बौद्ध लोकच बोलत होते पण आता मराठा समाजातील तरुणही यावर बोलायला लिहायला लागले. म्हणून विषमतेचे जहर पेरणाऱ्या राजकीय नेत्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधानाची पेरणीच होऊ नये म्हणून व्यवस्था निर्माण करण्याचे काम करत आहेत. जागृत, सुशिक्षित व आंबेडकरवादी मराठा तरुणांना सुद्धां आता मागे ओढण्याचे काम सुरू झाले आहे. चळवळ ही रक्तात नसते तर ती विचारात असते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पैसे घेऊन सांगणाऱ्या अनेक टोळ्या निर्माण झाल्या, बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन गाणाऱ्या अनेक टोळ्या निर्माण झाल्या राजकीय फायद्यासाठी बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेणाऱ्या अनेक टोळ्या निर्माण झाल्या पण टोळ्या मुळें समाजाची ताकद कमी होऊन पाकीटबाज, लाचार आणि तडजोड करणारे पोटभरू म्हणून ओळख निर्माण झाली. परंतू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने व कार्याने प्रेरीत होऊन निर्भिडपणे प्रश्न विचारून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल जाणीव ठेवणारी माधवी जाधव एक सर्व सामान्य कर्मचारी आवाज उठवते तेव्हा समजते प्रजासत्ताक दिनाचे सार्थक झाले. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या हक्क अधिकाराचा उपयोग झाला. पण दुसरीकडे त्या रणरागिणी ची बाजु सकारात्मक मांडण्या ऐवजी तीची बातमी देताना कार्यक्रमात गदारोळात, गोंधळ असे शब्द वापरून माधवी जाधव यांना च आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला गेला. तेव्हा मला पुन्हा एकदा बाबासाहेब आंबेडकर यांची आठवण आली ते म्हणतात चळवळीला जर मुखपत्र नसेल तर चळवळीची अवस्था पंख छाटलेल्या पक्षा प्रमाणे होते. खंत आम्ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत पत्रकारिता, शिक्षण प्रणाली, वित्तप्रणाली निर्माण करू शकलो नाही. फक्त अभिव्यक्त स्वातंत्र्याच्या नावाखाली भाषणे देत गेलो. काही लोक यालाच प्रजासत्ताक म्हणतात.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मी ८ फेब्रुवारी शहापूर ला लग्नाला येईल कदाचित.... : उपमुख्यमंत्री अजितदादा पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वेळ संध्याकाळ २७ जानेवारी ४:१५...ठिकाण देवगिरी शासकीय निवासस्थान मलबार हिल..

राष्ट्रवादी काँग्रेस ठाणे जिल्हा महिला ग्रामीण अध्यक्ष सौ. कल्पना तारमळे, वैद्यकीय विभाग केतन वेखंडे आणि मी प्रफुल्ल शेवाळे काल दि. २७ जाने रोजी आदरणीय दादांची त्यांच्या मलबार हिल येथील शासकीय निवास स्थानी देवगिरी येथे भेट घेतली. निमित्त होतं ते सौ. कल्पना तारमळे यांच्या मुलाच्या लग्नाचं आमंत्रण देणे बाबत.

आम्ही तिघे राष्ट्रवादी च्या मुख्ययालयात लग्न पत्रिका देऊन मलबार येथे देवगिरी निवास स्थानी ठीक ४ ला पोहचलो. दादांची विडिओ कॉन्फेरंस मिटिंग चालू होती. अवघ्या दहा मिनिट मध्ये आम्हाला हॉल मधून दादांच्या मिटिंग रूम मध्ये बोलावण्यात आलं.

वेळ:-४.१० मिनिट

अजितदादा : हं बोला काय काम आहे?

तारमळे ताई : दादा नमस्कार, मुलाचं लग्न आहे. पत्रिका दयायला आलो आहोत.

दादा : केव्हा आहे लग्न?

तारमळे ताई:दादा, फेब्रुवारी च्या ८ तारखेला लग्न आहे. तुम्हाला आवर्जून यायचं आहे.

दादा : दादांना पत्रिका आणि निमंत्रण पत्र दिलं गेलं. दादा म्हणाले हे पहा, माझ्या एका नातेवाईकांचं लग्न आहे ८ फेब्रुवारी ला दुबई ला. हे लग्न त्यांनी माझी वेळ घेऊन ठरवले आहे. माझं जर दुबई लग्नाला जाणे रद्द झाले तर मी नक्कीच शहापूर ला ८ तारखेला लग्नाला येईल. काळजी नका करू..

आदरणीय दादांचे हे शेवटचे शब्द.... आणि आम्ही दादांचा निरोप घेतला.

आणि आमची ही भेट शेवटची भेट ठरली..

दादा आपल्याला सोडून गेले, विश्वास बसत नाहीये....

**– प्रफुल्ल शेवाळे**

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी येथील बाल चिमुकल्या कलाकाराने गाजविला रंगमंच

## पाणीटंचाई, अंधश्रद्धा, शिक्षण व महामानवांच्या विचाराचे मनोरंजनातून केले प्रबोधन



वागदरी/एस. के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी येथील शालेय विद्यार्थी अर्थात बालचिमकुल्या कलाकाराने गाजविला रंगमंच मनोरंजनातून केले शिक्षण पाणीटंचाई अंधश्रद्धा व महामानवांच्या विचाराचे प्रबोधन.

दि.२६ जानेवारी २२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी तालुका तुळजापूर येथे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी विविध गुणदर्शनच्या कार्यक्रमांमध्ये बालचिमुकल्या शालेय विद्यार्थी कलाकारानी विविध कलेचे सादरीकरण करून शिक्षण पाणीटंचाई अंधश्रद्धा व महामानवांच्या विचाराचे मनोरंजनातून प्रबोधन केले.

सध्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेकडे पालकांचा ओघ वाढलेला दिसून येत आहे. त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी संख्या घटत असून शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.याविषयी माझी मराठी शाळा हे गीत सादर करून विद्यार्थ्यांनी मराठी माध्यमाच्या शिक्षणाविषयी पालकाना जाणिव करून दिली.

तर दिवसेन दिवस वृक्षतोड,जंगलतोड मोठ्या प्रमाणात करून सिमेंटचे बंगले उभारले जात आहेत त्यामुळे पर्जन्यमान कमी होऊन पाणीटंचाईला सामोरे जाण्याची वेळ येत आहे.याविषयी संत एकनाथ महाराजांच्या भारुड गीत प्रकारातून शालेय विद्यार्थ्यांनी

वरूण राजाची माया संपली आकाश कोपलं पाणी हरवल पाणी हरवल हे भारुड गीत सादर करून पाणीटंचाई विषयी प्रेक्षकांमध्ये जाणीव जागृती करून दिली. तर बुरगुंडा होईल तुला हे भारुड गीत सादर करून बिराजदार या विद्यार्थ्याने उपस्थित सर्व प्रेक्षकांचे मने जिंकली. सर्वांना आपल्या कलेतून मंत्रमुग्ध केले व वन्स मोर चा सन्मान मिळवला.

तसेच रडू नको बाळा मी पाण्याला जाते या गीतावर सामूहिक नृत्य सादर करून शालेय विद्यार्थिनींनी उपस्थित सर्व प्रेक्षकांचे लक्ष वेधले तर लावणी या नृत्य प्रकारातून आरोही अकाडे यांनी उत्कृष्ट नृत्य सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तर शालेय विद्यार्थ्यांनी मंचावर अक्षरशा रतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांचा दरबार उभा करून व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या गीतावर उत्कृष्ट नृत्य सादर करून महामानवांच्या विचारांचा जागर केला.

अशा प्रकारे एकाहून एक वरचढ कला सादर करून शालेय विद्यार्थ्यांनी त्यांच्या अंगी दडलेल्या सुप्त गुणांनाचे दर्शन घडविले.

या एकूणच कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन करून शाळेचे मुख्याध्यापक बी.बी. सगर यांनी पालकांना ग्रामस्थांना विद्यार्थ्यांना शेवटपर्यंत खेळवून ठेवले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहशिक्षिका एस. एस.मसे मॅडम,सहशिक्षक एन.एन काळे, डी. बी. अनपट, तानाजी लोहार सर आदीनी परिश्रम घेतले. यावेळी पालक गावातील प्रतिष्ठित व्यक्ती ग्रामस्थ महिला युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खंबीर नेता, उमदा सहकारी गमावला!; उद्धव ठाकरे हळहळले, ते सर्वार्थाने 'दादा' होते!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याने अवघा महाराष्ट्र हळहळला आहे. जिल्हा परिषद निवडणुकांच्या प्रचार सभांच्या निमित्ताने मुंबईहून बारामती दौऱ्यावर निघाले असताना लँडिंगवेळी अजितदादांचे विमान कोसळून पेटल्याने ही दुर्घटना घडली. यामध्ये अजित पवारांसह विमानातील पाचही जणांचा मृत्यू झाला. वयाच्या अवघ्या ६६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. अजित पवार यांच्या निधनाने पवार कुटुंबासह सर्वपक्षीय नेत्यांवर शोककळा पसरली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनीही भावना व्यक्त केल्या आहेत

'एक खंबीर नेता व माझ्या मंत्रिमंडळातील उमदा सहकारी गमावला,'' अशा शब्दांत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळात अजित पवार हे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री राहिले होते. अत्यंत शिस्तप्रिय, आपल्या खात्यावर वचक व अर्थ विभागाचा अभ्यास असणारे ते नेते होते. एक उत्तम सहकारी म्हणून त्यांचे माझे विशेष नाते जमले. अजित पवार हे दिलखुलास होते. मनात येईल ते बोलायचे. ते दीर्घद्वेषी नव्हते. राजकारणात त्यांनी वेगळा मार्ग स्वीकारला, तरी त्यांनी



संबंध तुटू दिले नाहीत, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

महाराष्ट्रात ते 'दादा' म्हणून लोकप्रिय होते. ते असे अकाली जातील असे वाटले नव्हते. कार्यकर्त्यांना जपणारा नेता म्हणून ते परिचित होते. त्यांच्या जाण्याने राज्यातील नेतृत्वात पोकळी निर्माण झाली. ते सर्वार्थाने 'दादा' होते. दादांना माझ्यातर्फे, 'ठाकरे' व शिवसेना परिवारातर्फे श्रद्धांजली! अशी श्रद्धांजली उद्धव ठाकरे यांनी वाहिली.

दादांसोबत गेले ५-६ वर्षं काम करण्याची संधी मिळाली पहिलं सरकारमध्ये आणि नंतर काही दिवस विरोधी पक्षात. त्यांची विधिमंडळ कारभारावर असलेली रुबाबदार पकड आणि प्रेमळ स्वभाव हा आमच्यासारख्या अनेकांना आवडायचा. मी हे विरोधी पक्षात असताना देखील अनेकदा जाहीरपणे म्हटलं होतं. आजची बातमी खरंच धक्का देणारी आहे. अजित दादांना आणि दुर्घटनेतील त्यांच्या सहकाऱ्यांना विनम्र श्रद्धांजली.

# खामसवाडी येथे जगदंबा कन्या प्रशालेत सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी/हनुमंत पाटुळे दि.२७(प्रतिनिधी)

कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे जगदंबा कन्या प्रशालेत दि.२६ जानेवारी भारतीय ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन सकाळी ७:३० वा ध्वजारोहण कार्यक्रम संप्पन झाला. तसेच गावातुन प्रभात फेरी काढण्यात आली. व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी भारतीय इतिहास दर्शवणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच शाळेतील आजी व माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण सोहळा संस्थेचे अध्यक्ष श्री.अशोक(बापू) त्रिंबकराव शेळके यांच्या व शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षण प्रेमी,पालक, ग्रामस्थ यांच्या हस्ते सत्कार करुन विद्यार्थ्यांना व सहशिक्षकांना कौतुकाची थाप दिली. या वेळी विविध गीतांवर विद्यार्थ्यांनी नृत्य सादरीकरण करुन संस्कृतीचे दर्शन उपस्थितांना घडवुन आणले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी, मान्यवर, ग्रामस्थ,पालक,विद्यार्थी,शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी,अंगणवाडी सेविका, गावातील शिक्षण प्रेमी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खामसवाडी जि. प. मतदार संघात वंचित बहुजन आघाडीचे पँथर अशोक कसबे यांची हवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : खामसवाडी जि. प मतदार संघात वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक कसबे यांची हवा असल्याचे मतदारातुन बोलले जात आहे.

खामसवाडी मतदारसंघात खामसवाडी, गोविंदपुर, बोरगाव, मळकरंजा, देवळाली आणि वाटवडा या ८ गावाचा समावेश आहे, गेल्या ७ दिवसा पासुन त्यांचा प्रत्येक मतदार संघात जाऊन मतदाराच्या गाठी भेटी घेऊन त्यांचे आशीर्वाद घेत प्रचार सुरु झालेला आहे.त्यामुळे विजयाचा मानकरी मीच आहे असे मुलाखतीत ठामपणे सांगितले आहे. कारण अशोक कसबे यांचा या मतदार संघामध्ये दांडगा जनसंपर्क आहे असेही ते म्हणाले ते गेल्या १० वर्षा पासुन निस्वार्थीपणे तन-मन धनाने प्रामाणिकपणे काम करतात. शेतकऱ्यांसाठी, शेतमजुरासाठी रस्त्यावर उतरून आंदोलने केली, सरकारी दरबारात जाऊन गोरगरीब जनतेची न होणारी कामे त्यानी केली, हिच त्यांच्या कामाची पावती म्हणुन मतदार राजा त्यांना स्वीकारणार असे त्यांनी ठाम पणे सांगितले, त्यामुळे त्यांना त्यांच्या विजयाची ग्वाही आहे.ड. बाळासाहेब आंबेडकरांचे हात बळकट



करण्यासाठी मी ही निवडणुक लढवत आहे असे ही त्यांनी या वेळी सांगितले.

# विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन

(पान १ वरून...) अजित पवार यांनी १९९५ पासून बारामती विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत.

शरद पवारांच्या वाढदिनी एकत्र

पवार कुटुंबीयांचे वलय महाराष्ट्रासाठी नवीन नाही. गेल्या सहा दशकांपासून पवार कुटंबीयांचं गारुढ समाज आणि राजकारणावर राहिलं आहे. शरद पवारांनी राष्ट्रवादीची स्थापना झाल्यानंतर अजित पवार यांनी केलेल्या बंडानंतर त्याची दोन शकले झाली. त्यामुळे कुटुंबातही विसंवाद झाला होता. मात्र, गेल्या काही दिवसांपासून झालं गेलं विसरून गेलं म्हणत अजित पवार आणि शरद पवार यांच्यातील राजकीय वादाची दरी कमी झाली होती. १२ डिसेंबर रोजी शरद पवार यांच्या वाढदिनी अजित पवार एकत्र जमले होते. त्यानंतर बारामतीमध्ये झालेल्या विद्या प्रतिष्ठानमध्ये झालेल्या कार्यक्रमातही हे काका पुतण्या एकत्र आले होते. महानगरपालिका निवडणुकीपासून दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा रंगली होती. मात्र, काळाने घातलेल्या झडपेत या सर्व आठवणी आता भुतकाळात गेल्या आहेत.

विमान कंपनी काय म्हणाली?

तडठ व्हेंचर्स म्हणजेच ज्या कंपनीच्या अजित पवार विमानातून उड्डाण करत होते, त्यांनी एक निवेदन जारी केलं आहे. पायलट धावपट्टी पाहू शकला नाही. त्याला अंदाजे १६ हजार तासांचा उड्डाणाचा अनुभव होता. सहवैमानिकाला अंदाजे १५०० तासांचा उड्डाणाचा अनुभव होता. विमानात कोणताही तांत्रिक दोष नव्हता. एअरलाइनकडे अजूनही सात विमाने आहेत. आम्ही ती ग्राउंड करत नाही आहोत. ऊग्रछ आमच्या विमानाची चौकशी करत असल्याचे म्हटलं आहे.

दुसरीकडे, १४ सप्टेंबर २०२३ रोजी, मुसळधार पाऊस आणि कमी दृश्यमानतेमध्ये मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर लँडिंग करताना व्हीएसआर व्हेंचर्सचे लिअरजेट ४५ जेट विमान कोसळले होते. दरम्यान, अजित पवारांच्या विमान अपघातानंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी चौकशीची मागणी केली आहे. ममता म्हणाल्या, कोणीही सुरक्षित नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली योग्य चौकशी झाली पाहिजे. हे विनाकारण भीती पसरवणारे आहे की कट आहे, हे काळच सांगेल. तथापि, सर्वात सोपा मार्ग म्हणजे पायलटला दोष देणे, जसे आपण मागील दोन प्रकरणांमध्ये पाहिले आहे.

जर एखाद्या वरिष्ठ राजकीय नेत्यासोबत अशी घटना घडू शकते, तर ती आपल्या व्यवस्थेच्या सुरक्षेबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित करते. मी असे अहवाल पाहिले की ते एनडीएमध्ये असताना त्यांच्या राजकीय स्थानाचा विचार करत होते. अशा परिस्थितीत, या घटना खूप चिंताजनक आहेत. मला इतर एजन्सींवर विश्वास नाही. त्या पूर्णपणे तडजोड केलेल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली तपास झाला पाहिजे. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अपघाताची चौकशी होणार असल्याचे म्हटलं असलं, तरी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुजोरा दिलेला नाही.

विमान वाहतूक मंत्री काय म्हणाले?

उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी सांगितले की, प्राथमिक माहितीनुसार, अजित पवार यांना घेऊन जाणारे विमान अपघातग्रस्त झाले तेव्हा बारामती विमानतळावर दृश्यमानता कमी होती. नायडू आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ पवारांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित राहण्यासाठी दिल्लीहून पुण्यात आले आहेत. ते म्हणाले की, जेव्हा एटीसी बारामतीने पायलटला धावपट्टी दिसत आहे का असे विचारले तेव्हा उत्तर नाही असे आले, त्यानंतर विमानाने फेरी मारली. ते म्हणाले की दुसऱ्या लँडिंग प्रयत्नादरम्यान, एटीसीने पुन्हा विचारले की धावपट्टी दिसत आहे का, ज्यावर पायलटने उत्तर दिले, हो, ते दिसत होते. एटीसीकडून लँडिंग परवानगी मिळाल्यानंतर विमान कोसळले असे नायडू म्हणाले. आम्ही अधिक माहिती शोधत आहोत आणि चौकशी करू, असे ते म्हणाले.

## स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या रा.से.यो. श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

# 'राष्ट्रीय सेवा योजने'तून उद्याचे जबाबदार नागरिक घडतात : सरपंच रामचंद्र घाडगे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'राष्ट्रीय सेवा योजना' ही विद्यार्थ्यांच्या आणि समाजाच्या उन्नतीसाठी एक अत्यंत महत्त्वाची संधी असून, या माध्यमातून तंत्रशिक्षण घेणारे विद्यार्थी ग्रामीण भागाशी एकरूप होतात, तेथील नागरिकांच्या समस्या समजून घेतात व समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखून त्याप्रमाणे भरीव कार्य करतात. एकूणच 'राष्ट्रीय सेवा योजने'च्या माध्यमातून उद्याच्या भारताचे जबाबदार नागरिक घडविण्याचे कार्य केले जाते.' असे प्रतिपादन अजनसोंड येथील सरपंच रामचंद्र घाडगे यांनी केले.

स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे अजनसोंड (ता. पंढरपूर) मध्ये आयोजिलेल्या 'विशेष श्रमसंस्कार शिबिरा'चा नुकताच समारोप करण्यात आला.यावेळी अजनसोंडचे सरपंच रामचंद्र घाडगे हे मार्गदर्शन करत होते. 'राष्ट्रीय सेवा योजने'अंतर्गत 'विशेष श्रमसंस्कार शिबिरा'चे दि.१० जानेवारी २०२६ ते दि.१६ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा समारोप दि. १६ जानेवारी २०२६ रोजी पार पडला. स्वेरी या संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. शिबिराच्या समारोपाच्या कार्यक्रमाप्रसंगी चिंचणी (ता. पंढरपूर) गाव हरित करणारे मोहन अनपट यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी संपूर्ण आठवडाभर परिश्रम घेऊन शिक्षण, आरोग्य, ग्रामस्वच्छता, वृक्षलागवड व जलसंवर्धन आदी विषयांवर विविध उपक्रम व जनजागृतीद्वारे उल्लेखनीय व अनुकरणीय कार्य केल्याचे सरपंच रामचंद्र घाडगे यांनी सांगून स्वेरील विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांकडून पडीक जमिनीचा उपयोग, वृक्षलागवड, स्वच्छता मोहीम, झाडांना पाणी देणे, गावातून जनजागृती रॅली काढणे, पथनाट्य सादरीकरण तसेच शाळांमध्ये चित्रकला, निबंध व विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. 'स्वेरी कॉलेजच्या विद्यार्थ्यांमध्ये असलेली शिस्त व कार्यतत्परता ही उल्लेखनीय असून, त्यांनी केलेले कार्य नेहमीच गुणवत्तापूर्ण असते,' असे सांगत अजनसोंड ग्रामस्थांनी स्वेरीचे विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, राष्ट्रीय




सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे, डॉ. धनंजय चौधरी तसेच सहभागी स्वयंसेवकांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी घेण्यात आलेल्या निबंध, चित्रकला व क्रीडा स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांनाही मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास उपसरपंच बाळासो कांबळे, ग्रामसेविका श्रीमती सविता हंजगीकर, शांताप्रभू प्रशालेचे शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक, ग्रामस्थ, प्रतिष्ठित नागरिक तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वरी मेटकरी यांनी केले तर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे यांनी आभार मानले.

# वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ज : सहा. पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे

## १ हजार ३८६ पोलीस अधिकारी व कर्मचारी, होमगार्ड; वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी माऊली स्कॉड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माघ शुद्ध एकादशी २९ जानेवारी २०२६ रोजी असून, या माघ यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती सहा. पोलीस अधीक्षक श्री.प्रशांत डगळे यांनी दिली.

माघ वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी १ हजार ३८६ पोलीस अधिकारी व कर्मचारी होमगार्ड यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये ०२पोलीस उपअधिक्षक, १७ पोलीस निरिक्षिक, ७९ सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, ६८८ पोलीस कर्मचारी व ६०० होमगार्ड तसेच आरसीपी, क्युआरटी, बीडीएस पथके, कार्ट पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, भक्ती सागर (६५ एकर), महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉड स्थापन करण्यात आले असून, यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच ड्रोन द्वारे व १६२ सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून देखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत.

वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी १० गामा पेट्रोलिंग व ९ ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर १३ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे असे, आवाहनही सहा. पोलीस अधीक्षक श्री. डगळे यांनी केले आहे.

## अजित दादा पवार यांच्या निधनाने पुरोगामी महाराष्ट्राच्या गडाचा एक खंबीर बुरुज कोसळला : नगर सेवक मारुती खारवे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी/ प्रतिनिधी : दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८.३० वा दरम्यान महाराष्ट्राचे कार्य कुशल खंबीर नेतृत्व तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे विमान अपघाताने बारामती विमानतळावर दु:खद निधन झाल्याची वार्ता वाऱ्या यासारखी महाराष्ट्रभर पसरली त्यांच्या दु:खद निधनाची वार्ता कळताच सर्व जाती धर्मातील आणि पक्षातील कार्यकर्ते जनता दु:ख सागरात बुडाली असून महाराष्ट्राचे खंबीर व सर्वांना समान न्याय देणारे नेतृत्व हरवल्यातील अदरांजलीपर प्रतिक्रिया अनेक कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.

या निमित्ताने बोलताना नळदुर्ग नगर परिषदेचे नगरसेवक तथा गटनेते मारुती खारवे हे आपल्याआदरांजली पर भावना व्यक्त करताना म्हणाले की महाराष्ट्र हा पुरोगामी विचाराचा मजबूत असा गड आहे आणि या गडाचा एक कणखं बुरुज अजित दादा यांच्या निधनाने कोसळ आहे.त्यांच्या निधनामुळे आज संबंध महाराष्ट्रत शोककळा पसरली आहे. तर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे धाराशिव जिल्हा सचिव एस.के. गायकवाड म्हणाले की महाराष्ट्राच्या राजकीय चळवळीतील एक धाडसी आणि कार्यकुशल व्यक्तिमत्व अजित दादा यांच्या निधनाने काळाच्या पडद्याआड झालं असून महाराष्ट्रातील राजकीय चळवळीमध्ये फार मोठी कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. तर रिपाइं (आठवले) चे नळदुर्ग सर्कल प्रमुख राजेंद्र शिंदे म्हणाले की एका कामाच्या निमित्ताने पाच सात वर्षांपूर्वी मी दादाची भेट मुंबईमध्ये घेतली होती.माझ्यासोबत असलेल्या कार्यकर्त्यांनी हे आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते राजेंद्र शिंदे अशी ओळख करून देताच त्यांनी हस्तांदोलन केलं त्यांच्या दु:खत निधनाची वार्ता कळताच त्यादिवशी त्यानी केलेला त्यांच्या हाताचा स्पर्श क्षणात मला जाणवला खूप दु:ख झालं असून एका न्यायिक नेत्याला आज महाराष्ट्र मुकला आहे.अशा श्रध्दांजलीपर भावना त्यानी व्यक्त केल्य.

## स्वेरीमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सहकाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित (दादा) पवार आणि त्यांच्या सोबत असणारे सहकारी यांचे विमान अपघातात आज अकस्मात निधन झाले. त्याबद्दल आज स्वेरीमध्ये त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली 'डीजीटेक रोबोटीक्स इंडीया प्रायव्हेट लिमिटेड'या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अजित गटेयांच्या हस्ते दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. यशपाल खेडकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जीवनशैली, कार्य करण्याची पद्धत याबाबत सविस्तर माहिती दिली तर संचालक अजित गटेयांनी श्रद्धांजली पर भाषणात दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या लक्षवेधी कार्य पद्धतीवर विशेष प्रकाश टाकला. स्वेरीचे सचिव डॉ. सुरज रोंगे हे जड अंत:करणाने म्हणाले कि, 'कामाचा उरक, प्रशासनावरील वचक आणि रोखठोक स्वभाव, महाराष्ट्राच्या राजकारणातील'दादा'व्यक्तिमत्व आज काळाच्या पडद्याआड गेलं. दादा,तुमचा तो पहाटे पासून काम करण्याचा उत्साह आणि विकासाचा ध्यास आता पुन्हा दिसणार नाही,ही जाणीवच सुन्न करणारी आहे. महाराष्ट्राने आज एक कार्यक्षम प्रशासक आणि जमिनीवरचा नेता गमावला आहे. दादांना प्रत्यक्षात कधी भेटलो नसलो तरी त्यांच्या निधनाच्या बातमीने डोळ्यात अश्रू आले, असा त्यांचा व त्यांच्या कार्याचा सर्वांच्या मनावर प्रभाव आहे. तुमचे कार्य आणि तुमचे विचार उभ्या महाराष्ट्राच्या मनात सदैव जिवंत राहतील.' उपस्थित असलेल्या सर्वांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व त्यांच्या समवेत निधन झालेल्या सहकाऱ्यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार,बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार,डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ,डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही.मांडवे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार,सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व पालक आदी उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन, महाविद्यालयात भावपूर्ण श्रद्धांजली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व प्रतिष्ठित राजकारणी अजितदादा पवार यांचे बारामती येथे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. तसेच विमानात असलेल्या इतरही सहप्रवाशांनी आपला जीव गमावला.

या दु:खद घटनेने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली असून विविध राजकीय व सामाजिक नेतृत्वांनी या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, राजेश कवडे, सुशील कुमार शिंदे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. समाधान माने, डॉ. अनिल चोपडे, आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. अमर कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत एक श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी एकत्र येऊन अजितदादा पवार यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी प्रार्थना केली आणि त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## निफाड येथे १ फेब्रुवारी ला श्री खंडेराव महाराज यात्रा उत्सव



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड परिसराचे आराध्य दैवत श्री खंडेराव महाराज यात्रा उत्सव दिनांक १फेब्रुवारी २०२६पासून प्रारंभ होणार ,असून सालाबाद प्रमाणे याही वर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, दिनांक२६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात रथांचा लिलाव करण्यात आला असून या रथाच्या लिलावाचे मानकरी निफाड नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे यांनी एक लाख ११ हजार १११ रुपये मध्ये घेतला असून या वेळी बारा गाड्यांचे विधिवत पूजन करण्यात आले

दिनांक १ फेब्रुवारी रोजी सकाळी ६/३० वाजता खंडेराव महाराज मंदिरात होम हवन होणार असून ८ वाजता शनी मंदिरापासून मांडव डहाळे यांची वाजत गाजत मिरवणूक निघणार आहे,९ वाजता खंडेराव महाराज पादुकांपासून निफाड कोर्टाच्या मागून कावडीची भव्य मिरवणूक कार्यक्रम होणार आहे, दुपारी २ वाजता कचेश्वर जानकीराम दुसाने यांच्या निवासस्थानापासून खंडेराव महाराज दैवतांचे पूजनास प्रारंभ होणार असून दुपारी ३ वाजता श्री मारुती मंदिर व शनी चौकात होम हवन होणार आहे. दुपारी ४/३० वाजता बाळासाहेब भानुदास लोखंडे यांचे जाणूस घरी भागवत बाबांचे स्नान आंघोळीचा कार्यक्रम होणार आहे ,सायंकाळी ६/३० वाजता रथ व बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होणार आहे याचे मानकरी नंदूभाऊ रमेश शेलार हे आहेत.

यावेळी यात्रा कमिटी अध्यक्ष उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे तसेच, खजिनदार सुभाष कर्डिले यात्रा कमिटी उपाध्यक्ष संदीप गाजरे व निफाड नगरपंचायतचे नगरसेवक/ नगरसेविका कर्मचारी वृंद, निफाड ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित. होते

## ईटकूर येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची शाखा स्थापन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ईटकूर प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील ईटकूर येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची शाखा स्थापन करण्यात आली. विवेकी समाज घडविण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीची नितांत आवश्यकता असून त्यासाठी कार्यकर्त्यांनी व्यापक समाज परिवर्तनाच्या चळवळीशी जोडून घेतले पाहिजे असे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य सरचिटणीस उत्तरेश्वर बिराजदार यांनी ईटकुर येथील सार्वजनिक वाचनालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना मत व्यक्त केले.

२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ईटकूर ता. कळंब येथे महाराष्ट्र अंनिसची शाखा स्थापन करण्यात आली. त्यावेळी बिराजदार सर बोलत होते.

सदृढ लोकशाहीसाठी कार्य करणारी महाराष्ट्र अंनिस ही एकमेव संघटना असून त्यांनी चळवळीची पंचसूत्री अनेक दाखले देऊन यावेळी स्पष्ट केली. विवेक जागर प्रकाशन विभागाचे राज्य सहकार्यवाह तुकाराम शिंदे यांनी कार्यक्रमाच्या सुरवातीला चळवळीची भूमिका विषद करुन मान्यवरांचे स्वागत केले. कळंब शाखेच्या प्राजक्ता पाटील यांनी समयोचित मार्गदर्शन केले. यावेळी धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष अरविंद शिंदे, कार्यकर्ते किसन लोंढे ईत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात पत्रकार सर्वश्री सुधाकर रणदिवे, कार्यकर्ते बाळासाहेब आडसूळ, सुयश रणदिवे, सोजल शिंदे, किशोर ईनकर, सोमनाथ जगताप, प्रणिता शिंदे, समिक्षा शिंदे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी शाखा कार्यकारिणी सर्वानुमते खालील प्रमाणे निवडण्यात आली.


अध्यक्ष - आबासाहेब आडसूळ, उपाध्यक्ष - प्रा. डॉ. उद्धव गंभीरे, किरण आडसूळ, कार्याध्यक्ष - भरत गुडे, प्रधान सचिव - हेमंत पोते, विविध उपक्रम - संतोष गिरे, महिला सहभाग - अर्चना रणदिवे, युवा सहभाग - अमोल रणदिवे, सांस्कृतिक अभिव्यक्ती - सुरेश लोंढे, सोशल मिडिया व्यवस्थापन - आदित्य रणदिवे, कायदेविषययक व्यवस्थापन - ॲड.सतिशकुमार रणदिवे, व्यसन : प्रबोधन आणि संघर्ष - अजीत गायके.

या कार्यक्रमाला गावांतील तरुण वर्ग उपस्थित होता.

### मिरासाब याकुबसाब मुजावर याची दर्गा ट्रस्टीमधुन हकालपट्टी : चेअरमन रफिक मुजावर

## हजरत ख्वाजा सैफुल मुलख चिस्ती कादरी हैद्रा दर्ग्याची जमीन हडप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/प्रतिनिधी : हजरत ख्वाजा सैपन मुलक चिस्ती,कादरी हैद्रा या दर्याची जमीन मिरासाब याकूबसाब मुजावर यांनी चेअरमन पदावर कार्यरत असताना दर्ग्याची एक एकर जमीन दर्ग्याच्या विश्वस्तांना कानो कान खबर न लागता परस्पर हडप केली,याप्रकरणी संबंधित मिरासाहब याकूबसाब मुजावर याची दर्गा ट्रस्टी मधून हकालपट्टी करण्यात आली आहे.अशी माहिती विद्यमान चेअरमन महमद रफीक मुजावर कादरी यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

सविस्तर माहिती अशी की,ख्वाजा पीर सैफुल मुलक दर्गाह मस्जीद व कब्रस्तान हैद्रा, ता.अक्कलकोट जि.सोलापूर ही वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत आहे.या वक्फ संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या फेरबदल अर्ज मंजूर करण्यासाठी मिरासाब याकुबसाब मुजावर यांनी फेरबदल अर्ज २०१७ मध्ये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल केले होते.

या प्रकरणांत जिल्हा वक्फ अधिकारी सोलापूर यांच्या कडुन या कार्यालयाचे पत्र क्र.मरावमं/चौकशी - अन्वये सदरहू फेरफार अर्जावर अहवाल मागविण्यात आले होते.

जि.व.अ. सोलापूर यांनी खालील प्रमाणे चौकशी अहवाल सादर केले असता चोकशी दरम्यान असे निदर्शनास आले की,सैफन हसनअली मुजावर, माजी चेअरमन व मो.गौस पाशा मुजावर माजी व्हा.चेअरमन त्यांच्या कार्यकाळात सन २०१५ मध्ये वक्फ संस्थेच्या हिसोबाचे लेखा परिक्षण केले नाही. व हिशोब नवीन पदाधिकायाकडे सोपविण्यात नाही.म्हणून त्यांना सन२०१७ मध्ये विश्वस्त मंडळाच्या बैठकीमध्ये या २ विश्वस्तांना पदावरुन हाकालपट्टी केले.

युसूफ बाशासाहेब मुजावर यांनी वक्फ संस्थेचे मिळकत क्रमांक १४, क्षेत्र १ हेक्टर ही मिळकत गुरु बिरप्पा शिवलिंगप्पा पाटील खंड करार करुन दिले आणि खंड करार करून देताना ट्रस्टच्या विश्वस्तांना विश्वासात घेतले नाही.खंड कराराची रक्कम ट्रस्टच्या खात्यात जमा न करता परस्पर ती रक्कमेचा दुरुपयोग केला.म्हणून २०१७ मध्ये विश्वस्त मंडळाच्या सभेत विषय व ठराव पारित करून युसूफ वाशासहेव मुजावर यांना विश्वस्त पदावरुन काढून टाकण्यात आले.तसेच खंड करार करून घेतल्याप्रकरणी गुरु बिरप्पा शिवलिंगप्पा पाटील यांचे विरुध्द वक्फ कार्यालयात तक्रार दाखल असून दरचा प्रस्ताव प्रलंबित आहे.

युसूफ दस्तगीर बाशासाहेब मुजावर यांच्या प्रमाणेच तात्कालीन चेअरमन मीरासाब याकुबसाब मुजावर हे सुद्धा हजरत ख्वाजा सैफुल मुलक चिस्ती कादरी हैद्रा दर्ग्याची एक एकर जमीन विश्वस्त यांना विश्वासात न घेता परस्पर हडप केली आहे.म्हणून वक्फ न्यायालयाच्या आदेशाने मीरासाब याकुबसाब मुजावर याची हैद्रा दर्गाच्या ट्रस्टीमधून हकालपट्टी करण्यात आली आहे.दर्गाचे मालमत्ता परस्पर हडप करणाऱ्या वर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी हजरत ख्वाजा सैफुल मुलख चिस्ती कादरी हैद्रा दर्ग्याचे चेअरमन महमद रफीक मुजावर कादरी यांनी वक्फ न्यायालयात केली.यावेळी व्हा. चेअरमन बंदेनवाज मुजावर व सेक्रेटरी ड नबीशाब मुजावर उपस्थित होते.